परीक्षा समन्वय कक्ष
परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)


Exam Co-ordination Section
Examination Department
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


**संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/22** **दिनांक : ०९/०१/२०२६**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा-नगर हवेली )

**विषय :** **BBA/BCA (Management)** या अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र २०२५ मधील प्रथम वर्ष (प्रथम सत्र) २०२४ पॅटर्नच्या प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्याबाबत.

**संदर्भ :** विद्यापीठ परिपत्रक क्र.४३/२०२५, परीक्षा समन्वय जा.क्र.१६४, दिनांक १५.०३.२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील **BBA, BBA (IB), BBA (CA) and BCA (Management)** या अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र २०२५ मधील प्रथम वर्ष (प्रथम सत्र) २०२४ पॅटर्नच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २७/०१/२०२६ ते दिनांक ३१/०१/२०२६ या कालावधीत महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करण्यात याव्यात.

तरी सर्व संबंधित महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करताना उपरोक्त संदर्भिय पत्रामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, ही विनंती.

कळावे,

आपला,

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत:** परिपत्रक क्र. ४३/२०२५ ची प्रत.



Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्रमांक : ४३/२०२५

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उन्हाळी सत्र मार्च/एप्रिल २०२५ परीक्षा आयोजनाबाबत**

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सत्र मार्च/एप्रिल, २०२५ परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे :

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील मार्च/एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रात होणाऱ्या पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेष लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन टप्प्याटप्प्याने दिनांक २५ मार्च, २०२५ पासून करण्यात आले आहे.

२. संबंधित सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी वरील संकेतस्थळावरुन वेळोवेळी माहिती घ्यावी. प्राचार्य, संचालक, महाविद्यालय/परिसंस्था परीक्षा अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक, परीक्षाविषयक कर्मचारी ह्यांनी ही बाब विद्यार्थ्यांच्या निदर्शनास वारंवार आणून द्यावी.

३. सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा तसेच सर्व मान्यताप्राप्त पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवीस्तरावरील प्रथम वर्षांच्या परीक्षा, तसेच विधी अभ्यासक्रम पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या एलएलबी व बीएएलएलबी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात यावे. उपरोल्लेखित पदविका व प्रथम वर्ष परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन करणे, उत्तरपत्रिका तपासणे, विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या संरक्षित अंतर्गतप्रणालीमध्ये गुण भरणे इत्यादी सर्व कामे महाविद्यालयस्तरावर करण्यात यावीत.

४. सर्व विद्याशाखांतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा तसेच पारंपरिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षांच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) अंतर्गत परीक्षांचे गुण, मौखिक परीक्षांचे गुण / प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण, तसेच लेखी परीक्षांचे गुण अशा सर्व कार्यांचे नियोजन तसेच विधी अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्ष (एलएलबी व बीएएलएलबी) परीक्षा आयोजनाच्या कालावधीबाबतीत वेळोवेळी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल.

५. पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य, विज्ञान) पदवीस्तर प्रथम वर्ष, विधी अभ्यासक्रम प्रथमवर्ष वगळून ह्या अभ्यासक्रमांची उर्वरित वर्षे तसेच पदव्युत्तरस्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांची पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या अनुरूप सत्रपरीक्षांचे आयोजन विद्यापीठस्तरावर करण्यात येईल.

६. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त पदविका, तसेच पारंपरिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान), तसेच विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष परीक्षांचे मूल्यमापन करण्यासाठी संबंधित महाविद्यालय हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम, ४८(१)(च) नुसार केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे प्राचार्य/संचालक हे त्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे (कॅप) संचालक म्हणून कामकाज पाहतील.

७. पारंपरिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांतील पदवीस्तर अंतिमपूर्व व अंतिम वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान) तसेच विधी अभ्यासक्रमातील एलएलबी पदवीचे अंतिमपूर्व व अंतिम वर्ष आणि बी.ए.एल.एल.बी पदवीचे दुसरे, तिसरे, चौथे व अंतिम वर्ष; पदव्युत्तरस्तरातील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, व्यावसायिक अभ्यासक्रमांची (विधी वगळून) पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या परीक्षांचे मूल्यमापन **केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प पध्दतीने विद्यापीठस्तरावर** करण्यात येईल. तसेच या अभ्यासक्रमांच्या केंद्रीय मूल्यमापन केंद्रांबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागामार्फत स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

८. उन्हाळी २०२५ सत्रपरीक्षांकरिता महाविद्यालय/परिसंस्थांकडून अनुरूप विविध सत्रांतर्गत गुण स्वीकारण्याच्या प्रणालीमध्ये परीक्षा विभागाद्वारे सुरक्षित व संरक्षित सर्व तपशीलांसह **एक्सेल शीट** उपलब्ध करून देण्यात येत असून पुरवण्यात आलेल्या एक्सेल शीटमध्येच अंतर्गत गुणांची नोंद करून सदर एक्सेल शीट विद्यापीठाच्या सुरक्षित व संरक्षित अंतर्गतगुणप्रणालीमध्ये अपलोड करण्यात यावी.

९. परिपत्रक १२५ अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे नियोजन महाविद्यालयस्तरावर विद्यापीठ परीक्षानियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे. याबाबत अशा १२५ अंतर्गत महाविद्यालयांनी परीक्षकांची यादी व वेळापत्रक एक महिना अगोदर विहीत मुदतीत परीक्षा विभागाकडे सादर करुन पूर्वमान्यता घेऊनच कार्यवाही करावी अन्यथा संबंधित महाविद्यालयाचे निकाल राखीव ठेवण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांच्या नुकसानीस व अहितास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

१०. सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना विशेष बाब संधीनुसार (पत्रांक परीक्षा/एसअँडटी/१३४३, दि. २६.०८.२०२४ व पत्रांक परीक्षा/एसअँडटी/१५६९, दि. २५.०९.२०२४) पात्र असणाऱ्या जुन्या विद्यार्थ्यांच्या नियमित व बहिःस्थ अभ्यासक्रमांच्या परीक्षा या समकक्ष विषयानुसार आयोजित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळावर अभ्यासक्रमांतर्गत जाहीर करण्यात आलेले समकक्ष विषयांची समग्र माहिती घेऊन त्याप्रमाणे परीक्षा द्यावी.

११. सर्व महाविद्यालये/ परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांनी परीक्षार्थींच्या बैठकव्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे व नियमानुसार करावे. तसेच अनुरूप हवा व उजेडासाठी पर्याप्त पंखे व विजव्यवस्था करण्यात यावी.

१२. महाविद्यालयांमध्ये जर आवश्यक बैठकव्यवस्थेकरिता साधने उपलब्ध नसतील तर संबंधित प्राचार्यांनी तात्पुरत्या व्यवस्थेची सोय करावी. त्यात कुचराई करू नये. विद्यापीठ नियमाप्रमाणे बैठकव्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक ह्यांच्यासह त्यांच्या सहकार्याने परीक्षा अधिकारी यांची राहील.

१३. परीक्षाकेंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वस्तू ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत मोबाईल/ तत्सम उपकरणे परीक्षाकक्षामध्ये आणणे, हे नियमबाहय व आक्षेपार्ह आहे. आपण ह्याबाबत जागृती करावी व खबरदारी घ्यावी. मोबाईल/उपकरणे हरविल्यास/चोरी/ गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल. याबाबतही संबंधित परीक्षा अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

१४. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे परीक्षाकेंद्रावरच्या सोयी व सवलती देय राहतील. या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रति तास २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तळमजल्यावर विशेष खोलीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना लेखनिक व इतर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

१५. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. याबाबतच्या पूर्वसूचना संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना द्याव्यात.

१६. काही कारणामुळे विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिका बारकोड संबंधित परीक्षा केंद्रास प्राप्त झालेले नसतील, तर त्यांना इमर्जन्सी बारकोड देऊन परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. इमर्जन्सी बारकोड असाधारण परिस्थितीतच वापरण्यात यावेत. परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना इर्मजन्सी बारकोडवरुन परीक्षेस बसविणे हा दखलपात्र गुन्हा असून त्याबाबत संबंधितावर कारवाई होऊ शकते, याची नोंद कृपया घ्यावी. याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/ परिसंस्थेचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी.

१७. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या नियमित परीक्षा आणि परिपत्रक १०४/२०२२ मध्ये नमूद विद्यापीठेतर संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास, तसेच याशिवाय उपरोक्त परिपत्रकात नमूद क्रमांक १ ते ५ ह्या कारणांकरिताही विशेष परीक्षा आयोजनाची कार्यवाही परिपत्रकानुसार करण्यात येईल. सदर विशेष परीक्षांची नियमावली इन-सेम परीक्षेस लागू असणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१८. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक ह्यांनी परीक्षेच्या प्रारंभापासून तिस-या दिवशीच केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प सुरू करावा. याबाबतच्या सूचनावलीचे पत्र स्वतंत्रपणे परीक्षा-छाननी व तालिकीकरण कक्षामार्फत पाठविण्यात येईल.

१९. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी सत्र, मार्च/एप्रिल, २०२५ परीक्षा आयोजनासाठी संबंधित महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे. केवळ नवीन महाविद्यालयांनी सादर केलेल्या परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाबाबत परीक्षा विभागाद्वारे नियुक्त समिती भेट देईल आणि समितीने सादर केलेल्या अहवालावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०. ज्या महाविद्यालयांमध्ये सबळ/सक्षम व स्वीकारार्ह पर्याप्त कारणांमुळे परीक्षा आयोजन करणे शक्य नसेल अशा महाविद्यालयांनी जवळच्या महाविद्यालयात परीक्षा आयोजनाबाबतचा पत्रव्यवहार विनाविलंब परीक्षा विभागाकडे सादर करावा. प्रस्ताव सादर करताना दुस-या महाविद्यालयाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' जोडणे अनिवार्य आहे.

२१. भरारी पथक सदस्य /वरिष्ठ बाहय पर्यवेक्षक /स्थायी निरीक्षक परीक्षा आयोजनाबाबत परीक्षा विभागाकडून वेळोवेळी जे आदेश प्राप्त होतील, त्या महाविद्यालयीन अध्यापकांनी, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षाविषयक आवश्यक ते सहाय्य व सेवा देणे हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४८ (४) नुसार बंधनकारक आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/परिसंस्थेच्या संचालकांनी अशा अध्यापकांना / अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठस्तर परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापनविषयक सर्व कामकाजांसाठी नमूद कालावधीकरीता तात्काळ कार्यमुक्त करणे अनिवार्य आहे.

२२. सदर परीक्षा सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने सर्वतोपरी दक्षता घेतली असून, सर्व उपाययोजना केलेल्या आहेत. याकरिता सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या असून दक्षता/भरारी पथके यांची नियुक्ती केलेली आहे.

२३. सदर परीक्षेवेळी संबंधित परीक्षाकेंद्रांना योग्य वेळी ऑनलाईन पद्धतीने प्रश्नपत्रिका प्राप्त झाली नाही, तर परीक्षा अधिकारी ह्यांनी ०२०-२५६२१४५३ या दूरध्वनी क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.

२४. महाविद्यालय प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक, परीक्षा अधिकारी ह्यांनी आपले मोबाईल क्रमांक परीक्षा कामकाजाकरिता अद्ययावत करावेत. हे संपर्क क्रमांक सतत संपर्कयोग्य असावेत. तसेच परीक्षा अधिकारी यांची नेमणूक दिनांक २० मार्च, २०२५ पूर्वी करण्यात यावी.

२५. जर संबंधित परीक्षाकेंद्रांना परीक्षा आयोजन करण्यासाठी उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साधनसामुग्री प्राप्त झाली नाही तर त्यांनी ०२०-२५१४६०, २५६२१४६२ या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षा गोदाम कक्षातून आवश्यक साधनसामुग्री घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

२६. सदर परीक्षांदरम्यान कोणत्याही विद्यार्थ्यांने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा विद्यापीठ अध्यादेश क्र. ०९ नुसार कारवाईस पात्र असेल. तसेच वेळोवेळी केंद्रशासन व राज्यशासन यांनी निर्गमित केलेले कायदे (IT Act 2000, Section 66) ह्यानुसारही गैरप्रकार करणारे विद्यार्थी कारवाईस पात्र असतील.

२७. विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निर्णयानुसार (सुधारित अध्यादेश क्र. १८४ 'अ' व 'ब' ) उन्हाळी सत्र, मार्च/एप्रिल, २०२५ परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहील. पदविका अभ्यासक्रम परीक्षा आणि प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) परीक्षांशी संबंधित छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन संबंधित महाविद्यालयाच्या स्तरावर करण्यात यावे. याबाबत विद्यार्थ्यांना संबंधित विभागामार्फत स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात येईल.

२८. पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवीस्तर प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) परीक्षांचे आयोजन करताना महाविद्यालयाच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकांचाच वापर करावा. या परीक्षांचे आयोजन करताना विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकांचा वापर करू नये, तसेच याबाबतीत आवश्यक ती सर्व गोपनियता व सुरक्षिततेची दक्षता घेण्यात यावी.

२९. धोरणात्मक निर्णयानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी (अभियांत्रिकी, औषधनिर्माण, स्थापत्य, व्यवस्थापन व विधी शाखा) ३६ पानी मुख्य उत्तरपत्रिका आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी (कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र शाखा) २४ पानी मुख्य उत्तरपत्रिका तसेच इन सेम परीक्षेकरिता फक्त १६ पानी मुख्य उत्तरपत्रिका वापरणे बंधनकारक असून या परीक्षांना पुरवणी सुविधा बंद करण्यात आलेली आहे, याची कृपया महाविद्यालय प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक, तसेच सर्व परीक्षा अधिकारी यांनी नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

३०. महाविद्यालय प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी ह्या सर्वानीच उपरोक्त मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व अध्यापक, अध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे आणि त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ: परीक्षा-समन्वय/१६४
दिनांकः- १५.०३.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा.

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

## EXAM COORDINATION SECTION

## WINTER SEMESTER MARCH/APRIL 2025 EXAM CONDUCT SCHEDULE

| Sr. No. | Name of the Program | Year | Pattern | Internal/ Practical and Theory Exam Dates | | Conduction Level |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | All Diploma | All | All | 25/03/2025 to 25/04/2025 | | College |
| 2. | B.A./B.Com./B.Sc./ B.Com. (B.B.A., I.B., C.A.) | First | All | 25/03/2025 to 25/04/2025 | | College |
| 3. | B.B.A. | First | All | 01/06/2025 to 20/06/2025 | | College |
| **Sr. No.** | **Name of the Program** | **Year** | **Pattern** | **Internal/ Practical Dates** | **Theory Exam Dates** | **Conduction** |
| 4. | B.Com. | III | All | 25/03/2025 to 04/04/2025 | 11/04/2025 to 22/04/2025 | University |
| 5. | B.Com. | II | All | 05/04/2025 to 15/04/2025 | 23/04/2025 to 03/05/2025 | University |
| 6. | B.A. | III/II | All | 01/04/2025 to 10/04/2025 | 11/04/2025 to 27/04/2025 (Morning & Evening) | University |
| 7. | Law | All | All | 09/04/2025 to 20/04/2025 | 21/04/2025 Onwards | University |
| 8. | B.Sc. | III | All | 25/03/2025 to 04/04/2025 | 09/04/2025 to 25/04/2025 | University |
| 9. | B.Sc. | II | All | 05/04/2025 to 15/04/2025 | 26/04/2025 Onwards | University |
| 10. | B.B.A. | III/II | All | 09/04/2025 to 19/04/2025 | 20/04/2025 Onwards | University |
| 11. | I.D.S. | All | All | 10/04/2025 to 22/04/2025 | 28/04/2025 Onwards | University |
| 12. | Other than above program | As per tentative Exam schedule | | | | |

**Note- All UG 2nd and 3rd year practicals should not be clashed with 1st year college level practicals.**

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**The Board of Examinations and Evaluation**